## MAHARASHTRA ACT No. XXII OF 1979.

## THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX (AMENDMENT) AND MAHARASHTRA TAX ON GOODS (CARRIED BY ROAD) (REPEAL) ACT, 1979.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १२ ऑगस्ट १९७९ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एस. ए. भोळे,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXII OF 1979.

## AN ACT FURTHER TO AMEND THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX ACT, 1958 AND TO REPEAL THE MAHARASHTRA TAX ON GOODS (CARRIED BY ROAD) ACT, 1962.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १४ ऑगस्ट १९७९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

**मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी आणि महाराष्ट्र (रस्त्यावरून वाहून नेण्यात येणाऱ्या) मालावरील कर अधिनियम, १९६२ निरसित करण्यासाठी अधिनियम.**

१९५८ चा मुंबई ६५.
१९६२ चा महा. ३३.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करणे आणि महाराष्ट्र (रस्त्यावरून वाहून नेण्यात येणाऱ्या) मालावरील कर अधिनियम, १९६२ निरसित करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) आणि महाराष्ट्र (रस्त्या-वरून वाहून नेण्यात येणाऱ्या) मालावरील कर (निरसन) अधिनियम, १९७९ असे म्हणता येईल.

(२) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलात येईल.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम, ६५ याच्या कलम २ ची सुधारणा. २. मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (यात यापुढे ज्याचा उल्लेख "मुख्य अधि-नियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये,— १९५८ चा मुंबई ६५.

(अ) खंड (२-अ) याला खंड (२-ब) असा नवा क्रमांक देण्यात येईल आणि अशा नवा क्रमांक दिलेल्या खंड (२-ब) पूर्वी पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"(२ अ) 'व्याज' म्हणजे, कलम ८-अ खाली द्यावयाचे व्याज ; ";

(ब) खंड (३) नंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"(३-अ) 'खाजगी माल वाहन' म्हणजे, भाड्यादाखल किंवा मोबदल्या दाखल असेल ते खेरीजकरून, मालाच्या वाहतुकीसाठी उपयोग करण्याकरिता तयार केलेले किंवा सुयोग्य करून घेतलेले कोणतेही मोटार वाहन, किंवा अशा रीतीने तयार केलेले किंवा सुयोग्य करून घेतलेले नसून जे सर्वस्वी मालाच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येत असेल किंवा वापरण्यासाठी ठेवलेले असेल असे कोणतेही मोटार वाहन ;

(३-ब) 'सार्वजनिक माल वाहन' म्हणजे, भाड्यादाखल किंवा मोबदल्यादाखल, मालाच्या वाहतुकीसाठी उपयोग करण्याकरिता तयार केलेले किंवा सुयोग्य करून घेतलेले कोणतेही मोटार वाहन किंवा अशा रीतीने तयार केलेले किंवा सुयोग्य करून घेतलेले नसून जे सर्वस्वी मालाच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येत असेल किंवा वापरण्यासाठी ठेवलेले असेल असे कोणतेही मोटार वाहन ;";

(क) खंड (६) ऐवजी पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"(६) 'कर' म्हणजे, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये बसविलेला कर, कोणताही आणखी किंवा जादा कर धरून; ";

(ड) खंड (७) नंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"(८) 'परिवहन आयुक्त' म्हणजे, राज्य शासनाने परिवहन आयुक्त म्हणून नेमलेला अधिकारी ; ".

सन १९५८ चा मुंबई अधिनियम, ६५ याच्या कलम ३ ची सुधारणा. ३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(अ) पोट-कलम (१-अ) नंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"(१-ब) या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, पोट-कलम (१) अन्वये बसवण्यात व वसूल करण्यात येणाऱ्या कराखेरीज, खाजगी माल वाहने व सार्वजनिक माल वाहने यावर राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी ठरवील अशा, दुसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या दरांपेक्षा अधिक नसणाऱ्या दरांनी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून एक आणखी कर बसवण्यात व वसूल करण्यात येईल. ";

(ब) पोट-कलम (२) च्या परंतुकानंतर, पुढील मजकुराची भर घालण्यात येईल :—

"आणखी असे की, वाहन उपयोगात नसण्याची मुदत सुरू झाल्यानंतर किंवा यथास्थिती मागील परंतुकात विनिर्दिष्ट केलेली मुदत संपल्यानंतर कराधान प्राधिकाऱ्यास अशी सूचना मिळाली असेल आणि सूचनेत विनिर्दिष्ट केलेली संपूर्ण मुदत सूचना मिळाल्याच्या तारखेपूर्वी समाप्त झालेली नसेल तर, कराधान प्राधिकाऱ्यास अशी सूचना मिळाल्याच्या तारखेपर्यंतच्या मुदतीसाठी द्यावयाचा कर पूर्णपणे वसूल करता येईल आणि विहित रीतीने असे प्रमाणपत्र देता येईल की, सूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या उरलेल्या काळामध्ये मोटार वाहन राज्यात वापरण्यात आले नव्हते किंवा वापरासाठी ठेवण्यात आले नव्हते. ";

(क) पोट-कलम (२) नंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल व तो, १ एप्रिल १९७३ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :—

"(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या पोट-कलमाखाली कोणतीही सूचना देण्यात आलेली नसली तरी, एखादे वाहन कोणत्याही मुदतीत राज्यात वापरण्यात आले नव्हते किंवा वापरासाठी ठेवण्यात आले नव्हते याविषयी परिवहन आयुक्ताची खात्री होईल, त्याबाबतीत, त्यास, लेखी नमूद करावयाच्या कारणांवरून असे प्रमाणित करता येईल की, प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत असे मोटार वाहन राज्यामध्ये वापरण्यात आलेले नव्हते किंवा वापरासाठी ठेवण्यात आलेले नव्हते.".

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ४, पोट-कलम (१), मध्ये खंड (चार) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— *सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ४ ची सुधारणा.*

"(चार) तिमाहीच्या अखेरच्या दिवशी संपणाऱ्या तिमाहीपेक्षा कमी असलेल्या कोणत्याही कालावधीसाठी ;

(अ) असा कालावधी, एका कॅलेंडर महिन्यापेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत, कराच्या वार्षिक दराच्या एक बारांश अधिक त्याच्या २० टक्के या दराने ;

(ब) असा कालावधी, एका कॅलेंडर महिन्यापेक्षा अधिक परंतु दोन कॅलेंडर महिन्यांपेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत कराच्या वार्षिक दराच्या दोन बारांश अधिक त्याच्या १५ टक्के या दराने ; आणि

(क) असा कालावधी, दोन कॅलेंडर महिन्यांपेक्षा अधिक असेल त्याबाबतीत, तिमाही दराने.".

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये,— *सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ८ ची सुधारणा.*

(अ) "उक्त कर" हा मजकूर जेथे येतो तेथे त्यानंतर "व देय असलेले व्याज, कोणतेही असल्यास," हा मजकूर, आणि "असा कर" हा मजकूर जेथे येतो तेथे त्यानंतर "व देय असलेले व्याज, कोणतेही असल्यास," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) समास टीपेतील "कराची" या शब्दानंतर, "व देय असलेल्या व्याजाची, कोणतेही असल्यास," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ८ नंतर, पुढील नवीन कलम समाविष्ट करण्यात येईल :— *सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ यात नवीन कलम ८-अ समाविष्ट करणे.*

"८-अ (१) कोणत्याही मोटार वाहनाच्या बाबतीत देय असलेला कोणताही कर तो देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तरतूद केल्याप्रमाणे मुदतीच्या आत दिला नाही तर अशी व्यक्ती, देय असलेल्या कराव्यतिरिक्त, असा कर ज्या कालावधीसाठी देय असेल अशा कालावधीच्या पहिल्या दिवसापासून व्याज देण्यास पात्र ठरेल. *कालमर्यादेत कर देण्यात न आल्यास द्यावयाचे व्याज.*

(२) पोट-कलम (१) अन्वये देय असलेले व्याज, ज्या कालावधीसाठीचा कर देण्यात आला नसेल अशा प्रत्येक कॅलेंडर महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी पुढीलप्रमाणे, म्हणजेच,—

(एक) कराची रक्कम देण्यात झालेल्या कसुरीबद्दल, अशी व्यक्ती ज्या महिन्यासाठी कर देय झाला असेल अशा महिन्यानंतर येणाऱ्या महिन्याच्या १५ तारखेस किंवा तत्पूर्वी स्वत: होऊन कळवील, आणि देय असलेला कर देण्यात आलेला असेल तर, अशा कसुरी केलेल्या कराच्या रकमेच्या १ टक्का या दराने; व

(दोन) इतर बाबतीत, अशा कसुरी केलेल्या कराच्या रकमेच्या २ टक्के या दराने मोजण्यात येईल :

परंतु, या कलमान्वये देय असलेल्या व्याजाची रक्कम ही, कसुरी केलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

(३) पोट-कलम (१) अन्वये देय असलेल्या व्याजाची रक्कम मोजताना, पन्नास पैशांपेक्षा कमी असलेला रुपयाचा भाग, पन्नास पैसे व पन्नास पैशांपेक्षा अधिक असलेला भाग हा, एक रुपया असा धरण्यात येईल.

(४) परिवहन आयुक्तास, लेखी नमूद करावयाच्या कारणांवरून व विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन, कोणत्याही विनिर्दिष्ट कालावधीच्या बाबतीत, या कलमान्वये देय असलेल्या संपूर्ण व्याजाची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची सूट देता येईल.".

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ९ ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये,—

(अ) पोट-कलम (४) मधील,—

(एक) खंड (अ), उप-खंड (दोन) च्या शेवटी असलेला "किंवा" हा शब्द ;

(दोन) खंड (क) पूर्वी असलेला "किंवा" हा शब्द ;

(तीन) खंड (क) ;

(चार) खंड (क) खालील दोन परंतुके, ही वगळण्यात येतील ;

(ब) पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल,—

"(४-अ) मोटार वाहनाच्या नोंदलेल्या मालकाने किंवा ते वाहन ताब्यात असणाऱ्या किंवा त्यावर नियंत्रण असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने तिच्याकडून देय असलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक कर दिला असेल त्याबाबतीत, कराधान प्राधिकारी, अशा नोंदलेल्या मालकाकडून किंवा व्यक्तीकडून अशा वाहनाच्या बाबतीत, कोणत्याही कालावधीसाठी कराची कोणतीही थकबाकी देय नाही याबद्दल खात्री करून घेतल्यानंतर, अशा नोंदलेल्या मालकास किंवा व्यक्तीस अशी अधिक रक्कम परत करील :

परंतु, जर असा नोंदलेला मालक किंवा अशी व्यक्ती कराधान प्राधिकाऱ्यास लेखी सूचना पाठवून आपणास परत करण्यात येणाऱ्या रकमेचे किंवा तिच्या कोणत्याही भागाचे विनियोजन अशा सूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही भावी कालावधीचा कर देण्यासाठी करण्यात यावा असे नमूद करील व अशा रीतीने कर दिल्याची नोंद करण्यासाठी असे कराधान प्रमाणपत्र सादर करील तर, कराधान प्राधिकारी, त्या प्रयोजनासाठी योग्य ती पडताळणी केल्यानंतर, कराधान प्रमाणपत्रात आपल्या सहीने नोंद करण्याची व्यवस्था करील व परत करण्यात यावयाच्या रकमेचे किंवा यथास्थिति तिच्या भागाचे, ज्या भावी कालावधीबाबत कराच्या रकमेचे विनियोजन करण्यात आले असेल तो कालावधी त्यामध्ये विनिर्दिष्ट करील आणि असे विनियोजन करण्यात आल्यानंतर, उर्वरित शिल्लक रक्कम, कोणतीही असल्यास, अशा मालकास किंवा व्यक्तीस परत करील.".

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५, याच्या कलम १०-अ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम १०-अ मधील पोट-कलम (१) मध्ये,—

(अ) "कर बसविण्यात येईल आणि तो वसूल करण्यात येईल" या मजकुरापूर्वी "कलम ४ मध्ये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(ब) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, वाहतूक वाहन ज्या कालावधीसाठी राज्यात वापरात आणले असेल किंवा वापरण्यासाठी ठेवले असेल तो कालावधी, सात दिवसांपेक्षा अधिक होत नसेल तर, बसवावयाचा आणि वसूल करावयाचा कर हा, एका महिन्यासाठी देय असलेल्या कराच्या एक तृतीयांश इतका असेल.".

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये,— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ११ ची सुधारणा.

(अ) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) "कलम ३, पोट-कलम (१)" या मजकुराऐवजी, "कलम ३, पोट-कलमे (१) व (१ब)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) "तदनंतर, प्रत्येक तिमाहीत होणारे कराचे उत्पन्न," या मजकुराऐवजी, "आणि त्यानंतर प्रत्येक तिमाहीसाठी कराच्या उत्पन्नाच्या पंचाहत्तर टक्के," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(ब) पोट-कलम (२) मधील खंड (क) मध्ये "दुसऱ्या अनुसूचीमध्ये" या मजकुराऐवजी, "तिसऱ्या अनुसूचीमध्ये" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मध्ये,— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम १२ ची सुधारणा.

(अ) "कोणताही कर" या मजकुराऐवजी, "कोणताही कर किंवा व्याज" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(ब) समास टीपेतील, "कराची" या मजकुराऐवजी, "कराची व व्याजाची" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

११. मुख्य अधिनियमाच्या कलम १२अ मध्ये,— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम १२अ ची सुधारणा.

"कर भरण्यात येईपर्यंत" या मजकुराऐवजी, "कर आणि देय असेल तर कोणतेही व्याज देण्यात येईपर्यंत" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

१२. मुख्य अधिनियमाच्या कलम १२ब मध्ये,— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम १२ ब ची सुधारणा.

"देय असलेला कर" या मजकुराऐवजी, "देय असलेला कर आणि व्याज, कोणतेही असल्यास", हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

१३. मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मधील पोट-कलम (२) मध्ये,— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम १३ ची सुधारणा.

(अ) "किंवा केवळ कोणत्याही धर्मादाय प्रयोजनासाठी किंवा त्याच्या अभिवृद्धचर्थ वापरण्यात येणाऱ्या मोटार वाहनास" या मजकुरानंतर "किंवा आग, पूर, भूकंप, अवर्षण किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमध्ये लोकांना सहाय्य देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही मोटार वाहनास" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(ब) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, अशा नैसर्गिक आपत्तीमध्ये लोकांना सहाय्य करण्यासाठी मोटार वाहनांचा वापर करण्यात येईल त्या बाबतीत, राज्य शासनाला, अशा नैसर्गिक आपत्तीमध्ये लोकांना सहाय्य

देण्यासाठी ज्या कालावधीमध्ये असे वाहन वापरण्यात आले असेल अशा कोणत्याही कालावधी-साठी त्या वाहनास कर भरण्यापासून भूतकालसापेक्ष सूट देता येईल.".

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम १४ अ ची सुधारणा.

१४. मुख्य अधिनियमाच्या कलम १४अ मधील "राज्य सरकारकडून परिवहन संचालक म्हणून नियुक्त केलेला" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम १६ ची सुधारणा.

१५. मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मध्ये,—

(अ) पोट-कलम (१) मधील,—

(एक) खंड (अ) मध्ये, "किंवा जादा कर" या मजकुराऐवजी "किंवा व्याज" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (एक) मध्ये, "अशा वाहनाबाबत देय असलेल्या तिमाही कराइतक्या" या मजकुराऐवजी, "अशा वाहनाबाबत दोन तिमाहीकरिता देय असलेल्या कराइतक्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) खंड (दोन) मध्ये, "अशा वाहनाच्या बाबतीत दोन तिमाहीबद्दल देय असलेल्या कराइतक्या" या मजकुराऐवजी, "अशा वाहनाच्या बाबतीत देय असलेल्या वार्षिक कराइतक्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (२) मध्ये, "कोणत्याही कराची" या मजकुराऐवजी "कोणत्याही कराची व व्याजाची" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(क) पोट-कलम (२) नंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"(३) ज्या व्यक्तीने, कलम ३ अन्वये देणे असलेल्या कराची रक्कम आणि कलम ८ अ अन्वये तिने देणे असलेले व्याज, कोणतेही असल्यास, पूर्णपणे भरले असेल अशा व्यक्तीविरुद्ध पोट-कलम (१), खंड (अ) खालील अपराधाबद्दल कोणताही खटला भरण्यात येणार नाही." ;

(ड) समास टीपेतील "कर" या शब्दाऐवजी "कर व व्याज" हे शब्द दाखल करण्यात येतील.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम १८ ची सुधारणा.

१६. मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये,—

(अ) पोट-कलम (१) मध्ये, "दाखल करण्यापूर्वी किंवा" हे शब्द वगळण्यात येतील ;

(ब) पोट-कलम (२) मध्ये, "कराची" या शब्दाऐवजी "कराची व व्याजाची" हे शब्द दाखल करण्यात येतील.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ यामध्ये कलम २५ समाविष्ट करणे.

१७. मुख्य अधिनियमाच्या कलम २४ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

१९७९ चा महाराष्ट्र २२. १९६२ चा महाराष्ट्र ३३.

"२५. मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) आणि महाराष्ट्र (रस्त्यावरून वाहून नेण्यात येणाऱ्या) मालावरील कर (निरसन) अधिनियम, १९७९ याचा प्रारंभ झाल्यावर महाराष्ट्र (रस्त्यावरून वाहून नेण्यात येणाऱ्या) मालावरील कर अधिनियम, १९६२ हा निरसित होईल : सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याचे निरसन व व्यावृत्ती.

परंतु, अशा निरसनामुळे,—

(अ) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमाचे पूर्वीचे प्रवर्तन किंवा त्याखाली केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट;

(ब) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमाखाली संपादन केलेला कोणताही अधिकार, मिळालेला विशेषाधिकार किंवा पत्करलेला बोजा किंवा दायित्व;

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या बाबतीतील कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा; किंवा

(ड) पूर्वोक्त अशा कोणत्याही अधिकार, विशेषाधिकार, बोजा, दायित्व, शास्ती, समपहरण किंवा शिक्षा यांसंबंधातील कोणतीही तपासणी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना या गोष्टींवर कोणताही परिणाम होणार नाही आणि जणू काही हे कलम अधिनियमित झाले नसल्याप्रमाणे अशी कोणतीही तपासणी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी शास्ती, समपहरण किंवा शिक्षा लादता येईल :

आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकास अधीन राहून, अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या संबंधित उपबंधान्वये केलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानले जाईल आणि या अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही याद्वारे ती निष्प्रभावित करण्यात आल्याशिवाय व येईतोपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील."

१८. मुख्य अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीनंतर पुढील अनुसूची समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ यात अनुसूची समाविष्ट करणे.

"दुसरी अनुसूची

[ कलम ३ (१ब) पहा ]

| | वाहनाची वाहनक्षमता म्हणजेच नोंदलेले ओझ्यासहितचे वजन व ओझेरहित वजन यांतील फरक | कराचा वार्षिक कमाल दर | |
|---|---|---|---|
| | | खाजगी मालवाहने | सार्वजनिक मालवाहने |
| | | रुपये | रुपये |
| १. | २ मेट्रिक टनांपेक्षा अधिक नाही अशा .. .. | २१०.०० | ४२०.०० |
| २. | २ मेट्रिक टनांपेक्षा जास्त परंतु ३ मेट्रिक टनांपेक्षा अधिक नाही अशा | ३००.०० | ६००.०० |
| ३. | ३ मेट्रिक टनांपेक्षा जास्त परंतु ४ मेट्रिक टनांपेक्षा अधिक नाही अशा | ४२०.०० | ८४०.०० |
| ४. | ४ मेट्रिक टनांपेक्षा जास्त परंतु ५ मेट्रिक टनांपेक्षा अधिक नाही अशा | ५१०.०० | १,०२०.०० |
| ५. | ५ मेट्रिक टनांपेक्षा जास्त परंतु ६ मेट्रिक टनांपेक्षा अधिक नाही अशा | ५७०.०० | १,१४०.०० |
| ६. | ६ मेट्रिक टनांपेक्षा जास्त परंतु ७ मेट्रिक टनांपेक्षा अधिक नाही अशा | ६३०.०० | १,२६०.०० |
| ७. | ७ मेट्रिक टनांपेक्षा जास्त परंतु ८ मेट्रिक टनांपेक्षा अधिक नाही अशा | ६९०.०० | १,३८०.०० |
| ८. | ८ मेट्रिक टनांपेक्षा जास्त परंतु ९ मेट्रिक टनांपेक्षा अधिक नाही अशा | ७२०.०० | १,४४०.०० |
| ९. | ९ मेट्रिक टनांपेक्षा जास्त परंतु १० मेट्रिक टनांपेक्षा अधिक नाही अशा. | ७८०.०० | १,५६०.०० |
| १०. | १० मेट्रिक टनांपेक्षा जास्त .. .. .. | ८४०.०० | १,६८०.००" |

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या दुसऱ्या अनुसूचीची सुधारणा.

१९. मुख्य अधिनियमातील विद्यमान दुसऱ्या अनुसूचीत "दुसरी अनुसूची" या शीर्षकाऐवजी "तिसरी अनुसूची" हे शीर्षक दाखल करण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कानिटकर,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.